॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२९ (प्रतिनीधी) : उद्योग आणि विद्यापीठ यांच्यातील संवाद अधिक वाढवून कौशल्यावर आधारित राजगाराभिमूख अभ्यासक्रम सुरु करावेत, ऑनलाईन अभ्यासक्रमांची संख्या वाढवावी, सोशल इनोव्हेशन ॲण्ड इन्क्युबेशन केंद्र सुरु करावे अशा काही सूचना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सल्लागार परिषदेच्या बैठकीत करण्यात आल्या. यावेळी गेल्या वर्षभरातील विद्यापीठाच्या प्रगती बद्दल समाधान व्यक्त करत समितीने विद्यापीठाचे अभिनंदन केले.

विद्यापीठ कायद्यान्वये विद्यापीठ सल्लागार परिषद गठन करण्यात आलेली असून जैन उद्योग समुहाचे अध्यक्ष अशोक जैन हे परिषदेचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या अध्यक्षतेखाली शुक्रवार दि. २९ नोव्हेंबर रोजी विद्यापीठात परिषदेची बैठक झाली. यावेळी परिषदेचे सदस्य माजी कुलगुरू डॉ. के.बी. पाटील, जबलपूरच्या मंगलयतन विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के.आर.एस. संबासीवा राव , हैद्राबाद विद्यापीठातील प्रा. राजीव वनकर, दीपस्तंभ फाऊंडेशनचे यजुर्वेंद्र महाजन, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा.एस.टी. इंगळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी प्रा.एस.टी. इंगळे यांनी प्रास्ताविक केले व गेल्यावर्षी झालेल्या परिषदेच्या बैठकीत ज्या सूचना विद्यापीठाला करण्यात आल्या होत्या त्याची अंमलबजावणी विद्यापीठाने कशा प्रकारे केली याची माहिती दिली. त्यानंतर कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांनी गेल्या वर्षी विद्यापीठाच्या प्रगतीचा, राबविलेल्या योजनांचे सविस्तर सादरीकरण केले. तसेच पुढील वर्षभरात राबविण्यात येणारे उपक्रम, नवीन अभ्यासक्रम यांची माहिती दिली. त्यानंतर सदस्यांनी काही उपयुक्त सूचना केल्या त्यामध्ये सेंटर फॉर एक्सलन्स, नवीन इंटीग्रेटेड कोर्सेस, इंडस्ट्रीयल डिझाइन प्रोग्रॅम, नवीन ऑनलाईन अभ्यासक्रम, प्राध्यापकांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण, मानसिक स्वास्थ्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांचे समुपदेशन, उद्योजकांसोबत अधिक संवाद आणि रोजगाराभिमुख व कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरु करणेबाबत या सदस्यांनी सूचना केल्या. गेल्या वर्षभरात विद्यापीठाने उत्तम कामगिरी केली असल्याची भावना अध्यक्षांसह सर्व सदस्यांनी व्यक्त करून कुलगुरू प्रा. माहेश्वरी व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. अध्यक्ष अशोक जैन यांनी हायड्रोफ्युअलचे महत्व लक्षात घेवून जैन समुहाकडून जर्मन तज्ज्ञांसोबत काही उपक्रम राबविले जात आहेत. विद्यापीठाला देखील या तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल अशी ग्वाही दिली. जैवतंत्रज्ञानात कुशल मनुष्यबळ मिळत नाही त्यामुळे विद्यापीठाच्या सहकार्याने विद्यापीठालगत असलेल्या ग्रामीण भागातील काही महिलांसाठी याविषयाचा छोटा अभ्यासक्रम सुरु केला जावा अशी भावना अशोक जैन यांनी व्यक्त केली.

या बैठकीला कुलसचिव डॉ. विनोद पाटील, अधिष्ठाता डॉ. अनिल डोंगरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रवींद्र पाटील, संचालक प्रा. आशुतोष पाटील, डॉ. राजेश जवळेकर, डॉ. जयेंद्र लेकुरवाळे, डॉ. सचीन नांद्रे, डॉ. दिनेश पाटील, विद्यापीठ कार्यकारी अभियंता एस.आर. पाटील, प्रा. समीर नारखेडे हे उपस्थित होते.

.....................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २९ नोव्हेंबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी